
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 8 | MAY - 2021

# स्वातंत्र्योत्तर काळातील भारत–अमेरिका संबंध : राजकीय विश्लेषण

प्रा. डॉ. उमेश शिवाजी पाटील
राज्यशास्त्र विभाग, कै.म.दि.सिसोदे ऊर्फ भाऊसाहेब कला व वाणिज्य महाविद्यालय,
नरडाणा,ता.शिंदखेडा, जि. धुळे.



भारत–अमेरिका संबंध पुर्ण मैत्रीचे कधीच नव्हते. वास्तविक अमेरिका लोकशाही तत्वांना महत्त्व देते. साम्यवादाला अमेरिकेचा विरोध आहे. कारण तिथे व्यक्ति स्वातंत्र्याला महत्त्व नाही. दुसऱ्या महायुध्दात अमेरिकेने भाग घेतला तो जगातील लोकशाही निर्धोक करण्यासाठी असे असतांना देखील अमेरिकेचा मा्त्र नेहमीच हुकूमशाही असलेल्या पाकिस्तानलाच पाठींबा राहिलेला आहे. अगदी आज देखील अमेरिकेच्या या धोरणात फारसा बदल झालेला नाही. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापुर्वी भारत–अमेरिका यांच्यात विशेष संबंध नव्हते. कारण ब्रिटीश सत्ता भारतीय नेत्यांचा संबंध इतर राष्ट्रांशी येऊ नये. याची खबरदारी घेत होती. दुसऱ्या महायुध्दापुर्वी अमेरिका जगाच्या म्हणजे युरोपच्या राजकारणापासून अलिप्त होती. भारताला स्वातंत्र्य दयावे यासाठी ब्रिटीश शासनावर अमेरीकेने कधीच दबाव आणला नाही. उलट भारतातील स्वातंत्र्य चळवळीला चिरडुन टाकण्यासाठी ब्रिटीश सरकारला अमेरिकेने सहकार्य दिले. 1945 ला सेन फ्रांसिस्को येथे झालेल्या संम्मेलनात रशियाने भारताला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे असा विचार मांडला, मात्र या संम्मेलनातही अमेरिकेने पुर्णपणे उदासिनता दाखवली. अमेरिकेच्या या धोरणामुळे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील नेते अतिशय नाराज झाले.

1946 मध्ये प्रथम भारत–अमेरिका यांच्यात राजनैतिक संबंधाची सुरूवात झाली. आसफअली यांची अमेरिकेत भारताचे प्रथम राजदूत म्हणून नियुक्ती झाली. अमेरिकेच्या या धोरणामुळे भारत स्वतंत्र झाल्यावर देखील भारत–अमेरिका संबंधात विशेष प्रगती झाली नाही. स्वातंत्र्य लढयात अमेरिकेने भारताची बाजू घेतली नाही हा स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेवर आलेल्या नेतृत्वाचा अमेरिकेवर प्रमुख आरोप होता. अमेरिकादेखील भारताच्या अलिप्ततेच्या धोरणाबद्दल साशंक होता. अलिप्ततेचे भारताचे धोरण खोटे आहे व भारत राशियाला मिळालेला आहे. ही अमेरिकेची सतत धारणा राहिली व त्यामुळे भारत–अमेरिका संबंधात अपेक्षित चांगला बदल होऊ शकला नाही.

भारत–अमेरिका यांचे संबंध कधीही मैत्रीपूर्ण नव्हते कारण राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विविध स्वरूपाच्या प्रश्नांबाबत दोघात एक वाक्यता पेक्षा मतभेदच अधिक होते.

## • भारत–अमेरिका मतभेद :

### 1. साम्यवाद व साम्यवादी राष्ट्रांच्या संदर्भात भेदभाव–

अमेरिका सर्व आंतराष्ट्रीय प्रश्नांचे मुळ साम्यवादात आहे असे मानत. असे साम्यवाद म्हणजे विस्तारवाद असे अमेरिकेचे मत होते. त्यातुलनेत पाश्चात्य वसाहतवाद, साम्राज्यवाद, रंगभेद, वंशवाद यांना अमेरिका प्रश्नच

मानायला तयार नव्हते. साम्यवादाला नियंत्रित करता आले तर सर्व आंतरराष्ट्रीय प्रश्न आपोआपच सुटतील ही अमेरिकेची भूमिका होती. साम्यवादाला थोपवणे हेच अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे लक्ष होते. अफ्रिका आशियातील राष्ट्रांना साम्यवादा विरोधी उभ्या केलेल्या लष्करी संघटनेत अमेरीका गुंतवू इच्छित होती. परंतू भारताचे परराष्ट्र धोरण यांच्या पुर्णतः विरूध्द होते. भारताचे परराष्ट्र धोरण अलिप्तावादी असल्यामुळे भारत साम्यवादाच्या पुर्णतः विरोधी नव्हते. भारत साम्यवादाला आंतरराष्ट्रीय प्रश्नाचे एक मात्र कारण मानत नव्हता.

## 2. भारताचा सर्व प्रकारच्या युध्दांना विरोध–

भारताचा शीतयुध्द असो किंवा प्रत्यक्ष युध्द असो या सर्व प्रकारच्या युध्दांना विरोध होता. त्यामुळेच भारत सर्व प्रकारच्या सैनिकी अड्डयांना व संघटनांना विरोध करीत होता. कारण भारताच्या मते, लष्करी संघटना या जगाला युध्दाकडे नेतील. मोठ्या राष्ट्रांनी लहान राष्ट्रांना सैनिकी साहाय्यता देऊ नये. असे भारताचे मत होते. यातुन युध्दजन्य परिस्थिती निर्माण होईल. अमेरिकेचे धोरण नेमके याविरूध्द होते. दुसऱ्या महायुध्दानंतर म्हणजे 1945 नंतर अमेरिकेने अनेक लष्करी संघटना तयार केल्या, तळ उभे केले, अनेक लहान राष्ट्रांना प्रचंड लष्करी मदत देऊन शीतयुध्दात ओढले. अमेरिका भारताला देखील त्यात सामील करून घेऊ इच्छित होती. ज्याला भारताने विरोध केला व स्वतंत्र धोरणाचा पुरस्कार केला.

## 3. गोवा प्रश्न आणि वंशभेद, रंगभेद–

भारताने सतत साम्राज्यवाद व वसाहतवादाला विरोध केला. या विरोधाचा एक भाग म्हणून पोर्तृगालच्या वसाहतवादातून गोवा मुक्त करणे आवश्यक होते. त्यानुसार 1961 मध्ये भारताने सैनिकी कारवाई करून गोवा मुक्त केले. या भारताच्या कृतीचे रशियाने समर्थन केले पण अमेरिकेने भारताच्या या कृतीला विरोध दर्शविला व पोर्तृगालची बाजू घेतली. भारताने संयुक्त राष्ट्रात व बाहेर वंशभेदाच्या दक्षिण अफ्रिकेच्या सरकारविरूध्द आवाज उठवून संयुक्त राष्ट्रात तर अमेरिकेने नेहमी वर्णभेद, वंशभेद, करणाऱ्या दक्षिण अफ्रिका सरकारची बाजू घेतली. दक्षिण अफ्रिका सरकार विरूध्द कोणताही ठराव सम्मत होणार नाही. याची अमेरिकेने सतत काळजी घेतली आणि वंशभेदाच्या प्रश्नाला अमेरिकेने कधी महत्त्व दिले नाही.

## 4. अफ्रिका आशिया खंडातील स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना युनोमध्ये प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी भारत सतत प्रयत्नशिल :

अफ्रिका व अशिया खंडातील स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांची संख्या सतत वाढत असल्यामुहे युनोमध्ये या राष्ट्रांना प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी भारत प्रयत्न करत होता तर पाश्चात्य राष्ट्रे याला विरोध दर्शवित होती. नवोदित राष्ट्रांच्या प्रश्नाला भारत अधिक महत्त्व देत होता. तर अमेरीका त्या देशात साम्यवादाने शिरकाव करू नये म्हणून त्या राष्ट्रांना फक्त लष्करी मदत देऊ इच्छित होते. भारत त्यांच्या आर्थिक, औद्योगिक विकासात सैनिकी मदत मुख्य बाधा समजत होती. तिसऱ्या जगातील राष्ट्रांच्या संदर्भात भारत अमेरीका यांच्यात भिन्न दृष्टीकोन होता.

## 5. चीनसंबंधी भिन्न दृष्टिकोन–

1949 मध्ये चीन साम्यवादी झाला. अमेरिकेला आशिया खंडात लक्ष घालणे आवश्यक झाले. आशिया खंडात चीनला रोखण्यासाठी अमेरिकेने भारताला मजबूत करण्याचे ठरविले याचवेळी 1949 मध्ये नेहरू यांनी चीनला भेट दिली. नेहरू यांनी यावेळी स्पष्ट केले की, भारत आर्थिक साहाय्यतेच्या बदल्यात परराष्ट्र धोरण गहाण ठेवू इच्छित नाही. अफ्रिकेचे परराष्ट्र धोरण भारत सोडू इच्छित नाही. इतकेच नव्हे तर अमेरिकेचा विरोध असतांना भारताने साम्यवादी चीनच्या सरकारला मान्यता दिली.

## 6. कोरिया युध्द आणि सुवेझ कालवा–

उलट कोरियाने दक्षिण कोरियावर 1950 मध्ये केलेले आक्रमण परतून लावण्यासाठी अमेरिकेने संयुक्त राष्ट्रांच्या वतीने केलेले सैनिकी कारवाईचे समर्थन केले. पण भारताने या कारवाईसाठी सैन्य पाठवण्याचे नाकारले ही गोष्ट अमेरिकेला रूचली नाही. सुरक्षा परिषदेत अमेरिकेने चीनला आक्रमक घोषित करण्याचा प्रस्ताव मांडला

तेव्हा भारताने त्या प्रस्तावाला विरोध केला. यामुळे दोन्ही देशात मतभेद निर्माण झाले. तसेच अमेरिकेने व्हिएतनामवर केलेल्या बॉम्बफेकीचा भारताने प्रखर विरोध केला. त्यांचा परिणाम देखील संबंधावर झाला. 1956 मध्ये इजिप्तने सुवेझ कालव्याचे राष्ट्रीयकरण केले. त्याला अमेरिकेने विरोध केला. उलट भारताने इजिप्तच्या कृतीचे समर्थन केले. पण इंग्लंड फ्रॉन्स व इस्त्राईल यांनी राष्ट्रीयकरणाला विरोध म्हणून इजिप्तवर हल्ला केला तेव्हा मात्र अमेरिकेने इंग्लड, फ्रॉन्सला विरोध केला. इजिप्ततेचे राष्ट्रीयकरणाचे समर्थन केले.

भारत–अमेरिका संबंधात बिघाड झाला तो प्रामुख्याने अमेरिकेच्या पाकिस्तानला मिळणाऱ्या लष्करी मदतीमुळे होय. साम्यवादी चीनला विरोध करण्यासाठी अमेरिकेने प्रथम भारताला चीनविरूध्द उभे करण्याचा प्रयत्न केला. तो अयशस्वी झाल्यानंतर अमेरिकेने पाकिस्तानला लष्करी मदत देण्याचे ठरविले. पाकिस्तान, रशिया व चीनला लागून असल्यामुळे अमेरिकेने पाकिस्तानला मोठया प्रमाणात शस्त्रास्त्रांची मदत केली. अमेरिकेने मोठया प्रमाणावर पाकिस्तानला शस्त्रास्त्रांची मदत केल्यामुळे भारताने विरोध केला. कारण या मदतीचा उपयोग पाकिस्तान भारताच्या विरूध्द करेल अशी शंका भारताने अमरिकेला बोलून दाखविली 1965 च्या भारत–पाकिस्तान युध्दात पाकिस्तानने अमेरिकेच्या शास्त्रास्त्रांचा वापर केला व ही गोष्ट भारताने अमेरिकेच्या नजरेत आणून दिली तेव्हा अमेरिकेने कोणतीही कारवाई पाकिस्तानच्या विरूध्द केली नाही. तसेच़ काश्मीरच्या प्रश्नावर अमेरिकेने नेहमीच पाकिस्तानची बाजू घेतली. संयुक्त राष्ट्रसंघात सुरक्षा समितीत जेव्हा–जेव्हा काश्मीरचा प्रश्न उपस्थित झाला. तेव्हा अमेरिकेने आपले वजन भारताच्या विरोधात वापरले.

1962 मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. भारत या आक्रमणाला विरोध करू शकला यावेळी अमेरीकेचे अध्यक्ष केनेडी होते. भारताने यावेळी अमेरिकेकडून शास्त्रास्त्रांची मदत मागितली. अमेरिकेने ती तात्काळ स्विकारली व भारताला मदत केली. अमेरिकेने भारताचा मॅकमोहन रेषेबाबतचा दावा मान्य केला. या भारताला मिळणाऱ्या लष्करी मदतीच्या विरूध्द पाकिस्तानने बरीच ओरड केली पण त्याकडे अमेरिकेने फारसे लक्ष दिले नाही. 1963 ला नेहरू यांनी चांगले संबंध प्रस्थापित व्हावे यासाठी प्रयत्न केले. पण त्यालाही अमेरीकेने फारसा–प्रतिसाद दिला नाही.

1965 मध्ये पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले. यावेळी पाकिस्तानला अमेरिकेने जो शास्त्रास्त्र पुरवठा केला होता. त्याचा वापर पाकिस्तानने भारताविरूध्द केला. जेव्हा अमेरिका पाकिस्तानला शस्त्रास्त्रांची मदत करत होते. तेव्हा भारताने अमेरिकेच्या लक्षात आणून दिले परंतू त्याकडेही अमेरिकेने फारसे गांभीर्याने घेतले नाही. फक्त जर पाकिस्तानने त्या शस्त्रांस्त्रांचा वापर भारताविरूध्द केला तर, अमेरिका भारताला मदत करेल. परंतू प्रत्यक्षात जेव्हा 1965 ला भारत–पाकिस्तान युध्द सुरू झाले व भारताविरूध्द पाकिस्तानने शस्त्रास्त्रांचा वापर करायला सुरूवात केली. त्यावेळेस अमेरिकेने भारताला प्रत्यक्षात मदत केली नाही. फक्त अमेरिकेने युध्दबंदीचा प्रयत्न केला. 1967 ला अमेरिकेने भारताविरूध्द सतत हिंसात्मक कारवाया करणारा व फुटीरतावादी तत्वांचा समर्थक 'नागा विद्रोही फिजो' यास अमेरिकेने राजाश्रय दिला व भारताला दिली जाणारी मदत कमी केली.

1971 च्या भारत–पाक युध्दाच्या वेळी अमेरिका पाकिसतानच्या बाजूने होती. मानवी हक्काच्या बाजूने सतत बोलणारी अमेरिका व पाकिस्तानने बांगला देशात प्रचंड कत्तल केली तेव्हा अमेरिका शांत होती. पाकिस्तान अमेरिकेचे शीतयुध्दातील एक हत्यार होते. म्हणूनच त्यांचे विभाजन अमेरिकेला नको होते आणि ते होणार असे दिसताच अमेरिकेने बंगालच्या उपसागरात सातवे अरमार उभे केले. युध्द थांबले तर पाकिस्तानचे विभाजन होणार नाही. यासाठीच अमेरिकेने युध्द चालू असतांना, असा आरोप केला की, भारताने पाकिस्तानवर आक्रमण केले आहे व युध्दबंदी अवलंबावी असा प्रस्ताव सुरक्षा परिषदेत मांडला हा प्रस्ताव रशियाने नकाराधिकार वापरून संम्मत होऊ दिला नाही. तरी ही हा प्रस्ताव संम्मत करण्यासाठी अमेरिकेने युध्दबंदीचा प्रस्ताव महासभेकडे नेला. महासभेने हा प्रस्ताव 7 डिसेंबर 1971 ला मंजूर केला पण भारताने तो मानला नाही. यामुळे अमेरिकेचे तत्कालिन अध्यक्ष जॉर्ज डब्ल्यु बुश यांनी भारताची कडक शब्दात निंदा केली व पाकिस्तानची प्रशंसा केली.

## • भारत–अमेरीका संबंध व भारताचे पंतप्रधान :

### 1. पंडीत जवाहलाल नेहरूंचा काळ :–

स्वातंत्र्यानंतर भारत–अमेरिका संबंध तणावाचेच राहिले. 1947 ला पाकिस्तानने काश्मीरवर आक्रमण केले. त्याचवेळी अमेरिकेने पाकिस्तानची बाजू घेतली. नेहरूंनी अमेरिकन संधी गटात समाविष्ट होण्याला नकार देऊन अलिप्त गट स्थापन केला. शिवाय साम्यवादी चिनला मान्यता दिली. या पार्श्वभूमीवर भारत–अमेरिकन संबंध

तणावाचेच राहिले. कनेडीच्या काळात भारत–अमेरिका संबंध सुरळीत व्हायला थोडी मदत झाली. 1960 मध्ये अमेरिकेचे चेस्टर बोल्स या अमेरिकन भारतातील राजदुतांच्या प्रयत्नामुळे पी.एल. 480 हा करार झाला व 1962 च्या भारत–चीन युध्दात अमेरिकेने भारताला लष्करी साहित्य पुरविणे या संबंधात सुधारणा झाली.

### 2. लाल–बहादुर भास्त्रींचा काळ :–

भारतात अन्नधान्याचा तुटवडा होता. यासाठी अमेरिकन मदत मिळावी म्हणून शास्त्रीजींनी अमेरिकेला भेट देण्याचे ठरविले. याच काळात अमेरिकेने व्हिएतनामावर आक्रमण केले. परिणामी अमेरीकेचे अध्यक्ष 'जॉनसन्स' कार्यात व्यस्त असल्यामुळे शास्त्रींनी अमेरिकेला भेट देऊ नये असे कळवले. 1965 च्या भारत–पाक युध्दातही पाकिस्तानची बाजू अमेरिकेने घेतली त्यामुळे शास्त्रीजींच्या काळात राजकीय संबंध मतभेदाचे राहिले.

### 3. इंदिरा गांधींचा काळ :–

1966 मध्ये इंदिराजी सत्तेवर आल्या. राष्ट्रध्यक्षांनी इंदिराजींचे अभिनंदन करून अमेरिका भेटीचे आमंत्रण दिले. 28 मार्च 1966 पासून या यात्रेला प्रारंभ झाला. परंतू अमेरिकेकडून व्हिएतनामावर केलेल्या हस्तक्षेपाला भारताने विरोध केला. अरब–इस्त्राईल संघर्षात अमेरिकेने इस्त्राइलचे तर भारताने अरब देशांचे समर्थन केले यातून तणाव निर्माण झाले. 1969 मध्ये निक्सन भारत दौऱ्यावर आले तेव्हा त्यांनी हे संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न केले. इंदिराजी न्युयार्कला गेले तेव्हा अमेरिकन दुतावासातील महत्त्वाचा अधिकारी उपस्थित नव्हता. बांग्ला देशाच्या निर्मिती काळात ही कटूता आणखी वाढली. अमरिकेने सुरक्षा मंडळात भारताविरूध्द ठराव मांडला. 1975 मध्ये भारतात आणिबाणी लागू झाली खरे तर ते वाईटच होते पण त्यावर अमेरिकेच्या अध्यक्षाने टिका करावी हे हास्यास्पद होते. कारण भारतात लोकशाही असतांना अमेरिकेने मात्र पाकिस्तानातील लष्कशाहीला सत्तेवर राहण्यासाठी मदत केली आणिबाणीवर अमेरिकेने केलेली टीका भारताच्या अंतर्गत कारभारावर हस्तक्षेप आहे असा आरोप इंदिरा गांधींनी केला.

### 4. मोरारजीं देसाईंचा काळ :–

1977 मध्ये जनता पक्षाचे मोरारजी देसाईंचे सरकार सत्तेवर आले. याचवेळी अमेरिकन सिनेटने भारताविरूध्द कायदे केले. भारताचे परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी पॅरीस संम्मेलनात भाग घेण्यासाठी गेले तेव्हा अमेरिकन परराष्ट्र सचिवांनी त्यांची भेट घेतली. व मैत्री पूर्ण संबंध स्थापनेवर भर दिला. राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर यांनी भारत भेट दिली व भारतीय नेत्यांशी चर्चा करून 1978 मध्ये मोरारजी देसाईंनी अमेरिकेला भेट दिली यावेळी तारापूर अणूकेंद्राला इंधन पुरविणे व परमाणू क्षेत्रात सहकार्यांचे अमेरिकेने आश्वासन दिले नंतर 1979 मध्ये वाजपेयींनी अमेरिकेला भेट दिली. थोडक्यात जनता पक्षाचे हे संबंध काही मतभेद वगळता बरे राहिले.

### 5. राजीव गांधींचा काळ :–

1980 मध्ये श्रीमती इंदिरा गांधी पुन्हा सत्तेवर आल्या. अमेरिकेने जनता राजवटीत सुरू केलेला मदतीचा ओघ भारताला चालूच ठेवला. तारापूरसाठी युरेनियमचा पुरवठा करण्याची घोषणा केली. 1981 मध्ये अमेरिकेत अध्यक्षपदी रोनाल्ड रिगन निवडून आले. त्यांनी पाकिस्तानला शस्त्रपुरवठा चालू ठेवला. अमेरिकेने हिंदी महासागरात लष्करी शक्तीत वाढ केली. यावर भारताने तीव्र नापसंती व्यक्त केली. अमेरिकेने याकडे दुर्लक्ष केले. 1984 ला खलीस्थानचा स्वयंघोषित नेता अमेरिकेत गेला व तेथून भारताविरोधी करावाया करू लागला. भारताने याचा निषेध केला. अमेरिकेने तरीही जगजितसिंह चौव्हाणला भारतविरोधी कारवाया करण्यापासून परावृत्त केले नाही. याचा विपरीत परिणाम भारत–अमेरिका संबंधावर झाला. 1984 मध्ये इंदिराजींच्या मृत्यूनंतर राजीव गांधी सत्तेत आले. त्यांनी उदार अर्थनीतीची घोषणा केली आणि त्यामुळेच जेव्हा त्यांनी अमेरिकेला भेट दिली तेव्हा त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. 1985 मध्ये राजीव गांधींनी अमेरिकेला भेट दिली यावेळी एक व्यापारी करार झाला. श्रीमती इंदिरा गांधीपेक्षा श्री. राजीव गांधींच्या काळात भारत–अमेरिका संबंधात निश्चितच सुधारणा झाली.

### 6. व्ही.पी.सिंह व चंद्रशेखर यांचा काळ :–

व्ही.पी.सिंह व चंद्रशेखर डिसेंबर 1989 ते जुन 1991 या दिड वर्षाच्या कालावधीत पंतप्रधान होते. त्यांच्या काळात भारत–अमेरिका संबंध साधारण राहिले. अमेरिका हा भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार राहिला. भारतीय निर्यात 18.5 टक्के व आयात 11.5 टक्के राहिली एप्रिल 1991 मध्ये भारतावर निर्बंध निर्णय घातले व नंतर स्थगित केले. आंतरराष्ट्रीय राजकीय दबावापाटी अमेरिकेच्या विमानमध्ये इंधन भरणे बंद केले.

### 7. पी.व्ही. नरसिंहरावांचा काळ :–

भारताने अणवस्त्र बंदी करारावर सही करावी यासाठी अमेरिकेने भारतावर दबाव आणला. परंतू भारत त्याला स्पष्टपणे नकार देत होता. मार्च 1992 मध्ये पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांनी स्पष्ट शब्दात अणवस्त्र बंदी करारावर सही करण्यास नकार दिलेला आहे. भारताच्या मते, अमेरिकेला पूर्ण जगावर अणवस्त्रांच्या क्षेत्रात स्वतःचे वर्चस्व निर्माण करावयाचे आहे आणि म्हणून अमेरिका भारतासारख्या राष्ट्रांवर ज्यामध्ये अणवस्त्र शक्तीची क्षमता आहे. दडपण आणून अणवस्त्र बंदी करारावर सही घेण्याचा प्रयत्न करीत आहे.

### 8. अटलबिहारी वाजपेयींचा काळ :–

भारतीय जनता पक्ष सत्तेवर आल्यानंतर मे 1998 मध्ये पोखरण अणूचाचणी यशस्वी पार पडली. भारताच्या या कृत्यावर अमेरिका चिडली व भारतावर आर्थिक निर्बंध लादले. सि.टी.बी.टी. करारावर स्वाक्षरीसाठी दबाव आणला मात्र गेल्या काही वर्षांमध्ये भारताने केलेली प्रगती भारतीय बाजार पेठांचे आकर्षण, मार्च 2000 ला बिल क्लिंटन भारताच्या भेटीवर आले. सुमारे 4 हजार कोटी डॉलर्स व्यापारी करारावर सहया झाल्या व नव्या संबंधाचा अध्याय सुरू झाला. कश्मीर प्रश्न द्विपक्षी असल्याचे मान्य करून भारताला सुरक्षा समितीत कायम सदस्यत्व देण्यास अमेरिकेने भारताचा सहानुभूतीपूर्वक विचार करेल. वाजपेयी–क्लिंटन यांनी 'व्हिजेन स्टेटमेन्ट' प्रसिध्द केले. याशिवाय जसवंतसिंग व तालबोट यांच्या दहशतवादाच्या संदर्भात चर्चेच्या दहा फेऱ्या झाल्या व नंतर वाजपेयींचा अमेरिकन दौरा त्यात ई–कॉमर्स व बॅकीग क्षेत्रातील प्रकल्पासाठी 6 अब्ज डॉलरच्या करारावर सहया झाल्या. यातून दोन देशांच्या संबंध सुधारण्याला गति मिळाली आहे. असे राजकीय निरिक्षकांचे मत आहे नंतर जॉर्ज डब्ल्यु बुश सत्तेवर आले. परंतु त्यांचे पाकिस्तान धार्जिण्ये धोरण बदलले नाही. मुर्शरफला चांगल्या वर्तनाचे शिफारस पत्र देऊन त्यातभर घातली. 13 डिसेंबर 2001 मध्ये भारतीय संसदेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा गांभिर्याने विचार केला नाही. 2002 मध्ये जॉर्ज फर्नांडीस, लालकृष्ण अडवाणी अमेरिकन दौऱ्यावर गेले शिवाय पावोल हे भारताच्या दौऱ्यावर येऊन वाजपेयींशी चर्चा करून संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. विशेषता भारत–पाकिस्तान संबंधात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला.

11 सप्टेंबर 2001 हा दिवस आंतराष्ट्रीय राजकारणाची समीकरण बदलणारा दिवस आहे. यादिवशी मुस्लीम दहशतवादयांनी अमेरीकेच्या जागतिक व्यापार केंद्र व पेंटागानवर हल्ला केला या घटनेनंतर अमेरिकेने जी करावाई केली. त्यास भारताने पुर्णपणे पाठिंबा दिला.

### 9. डॉ. मनमोहनसिहांचा काळ :–

मनमोहनसिहांच्या काळात भारत–अमेरिका संबंध सुधारण्यास चालना मिळाली व भारत अमेरिका संबंध दृढ झाले. एप्रिल 2005 मध्ये भारताचे परराष्ट्रमंत्री नटवरसिंह अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले व या दौऱ्यादरम्यान द्विपक्ष संबंध घट्ट करण्याचे संकेत दिले गेले. 14 एप्रिल 2005 मध्ये भारताने अमेरिकेसोबत एक ऐतिहासिक हवाई सेवा समझोता करार केला हा करार म्हणजे दोन्हीं देशामधील हवाई उड्डानासंदर्भात ज्या काही अडचणी असतील त्या दूर होतील असे ठरले 28 जून 2005 रोजी पारंपारिक संरक्षणासंबंधी एक करार झाला व त्याकरारावर भारत व अमेरिकेने वॉशिग्टन येथे सही केली. 18 ते 20 जुलै 2005च्या अमेरिका दौऱ्याच्यावेळी डॉ. मनमोहनसिंह व अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष यांच्यात बैठक झाली व त्याबैठकीत भारताला जगाच्या पातळीवर आर्थिक, सामरिक व बौध्दिक क्षेत्रात नवीन उदयास येणारी शक्ती म्हणून मान्यता देण्यात आली. 18 जुलै 2005 रोजी भारत व अमेरिकेच्या दरम्यान महत्वपूर्ण असा नाभिकीय उर्जा समझौता करार झाला. भारताने जेव्हा 1974 मध्ये परमाणू विस्फोट घडवून आणला तेव्हा अमेरिकेने भारताला नाभिकीय क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारची मदत केली नाही. उलट भारतावर प्रतिबंध लावून दिले. 1 ते 3 मार्च 2006 मध्ये उच्चस्तरीय प्रतिनिधीसोबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष

जॉर्ज डब्ल्यु बूश भारताच्या दौऱ्यावर आले तेव्हा मनमोहनसिंहांच्या सोबत बैठक झाली व या बैठकीत संयुक्त घोषणापत्र मध्ये भारत व अमेरिका यांच्यातील परमाणू उर्जा क्षेत्रामध्ये 18 जुलै 2005च्या करारानुसार दोन्ही देशांनी एकमेकांना मदत करावी अशी इच्छा बोलून दाखवली. अमेरिकेन कनिष्ठ सभागृह कॉंग्रेसमध्ये प्रतिनिधीनी भारताच्या सोबत झालेला परमाणू सहमतीला मंजुरी दिली. नंतर तो प्रस्ताव वरीष्ठ सभागृह सिनेट मध्ये मंजुरीसाठी पाठविण्यात आला. या सर्व घडामोडीवरून डॉ. मनमोहनसिंहांनी आपल्या देशातील कायदेमंडळातील लोकप्रतिनिधींना 27 जुलै 2006ला सांगितले की, भारत परमाणू समझोताच्या बाबतीत कोणताही फेरबदल झाला तरी मंजुरी देणार नाही असे अमेरिकेला स्पष्ट सांगितले.

### 10. नरेंद्र मोदींजींचा काळ :–

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या काळात भारत–अमेरिका संबंध अधिक मजबूत आणि उत्तम झाले आहेत. दोन्ही देशांनी लोकशाही आणि दहशतवादाविरोधी बाबत असलेली कटिबध्दत्ता हा अमेरिकेच्या दृष्टिने अतिशय महत्वाचा भाग असल्याने भारत हा अमेरिकेचा नैसर्गिक मित्र आहे असे व्हाईट हाऊसचे माध्यम उपसचिव राजशहा यांनी म्हटले नरेंद्रमोदी यांची मनिला येथे असिआन परिषदेच्या निमित्ताने बैठक झाली. डोनाल्ड ट्रम्प यांच्या काळात दोन्ही देशांचे संबंध अधिक मजबूत झाले असून ते अधिक मजबूत होत गेले. अमेरिका आणि चीनच्या संबंधापेक्षा भारत आणि अमेरिका यांच्या संबंधात अनेक समान दुवे आहेत. मोदी यांच्याशी डोनाल्ड ट्रम्प यांचे संबंध उत्तम प्रकाराचे होते. जगातील ट्रम्प यांना जे नेते आवडतात. त्यात मोदींचा समावेश होता. डोनाल्ड ट्रम्प मोदींवर प्रभावित होऊन दोन्ही देशातील संबंध सुरक्षेच्या मुद्दयापासून आर्थिक मुद्दयाकडे वळले आहेत. तसेच या दोन्ही देशांचे लष्करही जगातील सर्वोत्तम असले पाहिजे यावर नरेंद्र मोदी व डोनाल्ड ट्रम्प यांनी भर दिला आहे. तसेच इंडो–पॅसिफिक भाग मुक्त आणि खुला असला पाहिजे यावरही दोन्ही नेत्यात एकमत झाले. भारत अमेरिकेकडून तेल खरेदी करीत असल्याबद्दलही ट्रम्प यांनी आनंद व्यक्त केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी व अमेरीकेचे विद्यमान अध्यक्ष ज्यो बायडन या दोन्हीं नेत्यांच्या संवादातून द्विपक्षीय धोरण ठरविण्यावर भर देण्यात आला आहे. भारत, ऑस्ट्रेलिया, जपान आणि अमेरिका हे चार देश एका विशेष गटाची स्थापना करण्यासाठी मंत्री स्तरावरील बैठकीदरम्यान एकत्र आले होते. नियमबध्द; आंतराष्ट्रीय व्यवस्था प्रादेशिक अखंडता व सार्वभौमत्व, कायदयाच्या चौकटीतील नियम पारदर्शकता, आंतराष्ट्रीय सीमांच्या पलीकडे समुद्री वाहतुकीसाठी स्वातंत्र्य आणि मतभेदाचे शांततामय मार्गाने निराकरण इत्यादी मुद्दयांशी बांधीलकी असल्याचे या बैठकीत अधोरेखित करण्यात आले. ज्यो बायडन प्रशासनच्या प्रारंभीच्या काळात या प्रकारची बैठक घेण्यात आल्याने अमेरिकेकडून या विषयाच्या व्याप्तीला प्राधान्य दिले असल्याचे स्पष्ट केले. तसेच वातावरणातील बदल आणि भारत प्रशांत महासागरीय देशादरम्यान स्वतंत्र व खुले वातावरण बायडन प्रशासनासाठी आधीच्या ट्रम्प प्रशासनाशी असलेले मतभेद अधोरखित करण्याचा सर्वात गंभीर मार्ग म्हणजे हवामान बदलविषयक नव्या कार्यक्रमावर लक्ष केंद्रित करणे हा होय. चीनच्या आक्रमक उदयाच्या पार्श्वभूमीवर मोदी आणि बायडन यांनी नियमाधारित आंतराष्ट्रीय व्यवस्था निर्माण करण्यासाठी समाविचारी देशासह काम करण्यास महत्व असल्याच्या मुद्दयांवर भर दिला जो बायडन प्रशासनाने कार्यभार स्वीकारल्यावर भारतासोबत घेतलेली भूमिका अधिक मजबूत आणि ठाम आहे.

### समारोप :

भारत–अमेरिका संबंधात सर्वसाधारणपणा आला नाही उलट त्यानंतरही अमेरिकेने भारत विरोधीच भूमिका घेतली. 1990 पूर्वी भारत रशिया करारानुसार रशिया भारतास क्रायोजनिक विमान व त्या विमानाचे तंत्रज्ञान देणार होता. अमेरीकेने रशियावर दबाव आणला व क्रायोजनिक विमान व त्या विमानाचे तंत्रज्ञान भारतास मिळू दिले नाही. अमेरिकेने रशियास 1990 नंतर जी आर्थिक मदत दिली. त्याचा वापर रशियावर दबावासाठी केला. भारताची वाढती शक्ती कमी करणे हाच अमेरिकेच्या धोरणाचा भाग 1990 नंतर म्हणजे शितयुध्दानंतर राहिला. व्यापक परिक्षण बंदी करार अर्थात सि.टी.बी.टी. वर भारताने स्वाक्षरी करावी यासाठी अमेरिकेने अनेक प्रकारे दबाव आणला प्रतिबंध घालण्यापर्यंत प्रयत्न केले. भारताने मात्र सि.टी.बी.टी. वर स्वाक्षरी केली नाही. परिणामतः दोन देशातील संबंध सर्वसाधारण झाले नाही. पण भारताविरोधी तिव्र भूमिका घेणे अमेरीकेने सोडले. भारत–पाक मधील कश्मीर प्रश्नावर सतत पाकची बाजू घेण्याऱ्या अमेरिकेने कारगीलच्या प्रश्नावर पाकची बाजू घेतली नाही.

अमेरिकेने पाकिस्तानवर दबाव आणला व कारगीलमधून सैन्यमागे घेण्यास भाग पाडले. 1998 मध्ये भारताने पोखरण येथे परमाणू विस्फोट परिक्षण केले. भारत–अणूवस्त्रधारी राष्ट्रांच्या रांगेत जाऊन बसला जगावर अणवस्त्रांच्या क्षेत्रात आपली मक्तेदारी असावी असे वाटणाऱ्या अमेरीकेस हे आवडले नाही. अमेरिकेने मोठया प्रमाणावर भारतावर आर्थिक प्रतिबंध लादले दक्षिण आशियात भारताची ताकद वाढू नये या अमेरीकेच्या भूमिकेमुळे दोन देशातील संबंध सर्वसाधारण झाले नाही.

## संदर्भ सूची :–


1. प्रा. बी. वाय. कुलकर्णी – सेट/नेट राज्यशास्त्र, विद्याभारती प्रकाशन, लातूर
2. प्रा. महादेव गव्हाणे – सेट/नेट – राज्यशास्त्र, गुरू समर्थ प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती–2002
3. डॉ. बी. एल. फडिया – यु.जी.सी. नेट/सेट. राजनिती विज्ञान, प्रतियोगिता साहित्य सिरिज, साहित्य भवन प्रकाशन, आगरा.
4. डॉ. शैलेन्द्र देवळाणकर – आंतराष्ट्रीय संबंध, विद्याबुक पब्लिशर्स, औरंगाबाद सुधारीत द्वितीय आवृत्ती – जून 2010
5. Maharashtra Times.com.-15 Novemebar-2017
6. www.orfonline.org. 4 मार्च 2021